Estd: 1962
A++ Accredited by NAAC
(2021) with CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
**PHONE : EPABX - 2609000 Email – affiliationt1@unishivaji.ac.in**
**FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र**
**दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)**
**फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९३२९४ व २६९२३३३.**

एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/माने / 2826 दिनांक 24 FEB 2022

No 0 0 1 8 2

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, शारीरिक शिक्षण,**
**शिक्षणशास्त्र, विधि, महाविद्यालये.**

**विषय:- कॅस अंतर्गत स्थान निश्चितीवेळी अटीवर मान्यता दिलेल्या शिक्षकांना अधिव्याख्याता व.श्रेणी/निवड श्रेणी, सहाय्यक प्राध्यापक (एजीपी ७००० व एजीपी ८०००) व सहयोगी प्राध्यापक (एजीपी ९०००) मध्ये तारखांमध्ये सुधारणा करुन घेणे बाबत..**

**महोदय/महोदया,**

महाविद्यालयीन शिक्षकांची केंद्रीय पध्दतीने **५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार** स्थाननिश्चिती करण्यासाठी विद्यापीठातर्फे वेळोवेळी शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले होते. सहयोगी प्राध्यापक स्टेज- ४ एजीपी ९००० व प्राध्यापक स्टेज - ५ (एजीपी १००००) स्थाननिश्चिती साठी **दि.१६.०९.२०२१ ते दि. १४.१०.२०२१** या कालावधीमध्ये स्थाननिश्चिती कॅस अंतर्गत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच अधिव्याख्याता व. श्रेणी व निवड श्रेणी, सहाय्यक प्राध्यापक स्टेज- २ एजीपी ७००० व एजीपी ८००० सहाय्यक प्राध्यापक Academic Level ११ व Academic Level १२ स्थाननिश्चिती साठी **दि.११.०१.२०२२ ते दि. २५.०१.२०२२** या कालावधीमध्ये स्थाननिश्चिती कॅस अंतर्गत शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते.

तथापि ज्या शिक्षकांच्या मागील स्थाननिश्चितीमध्ये काही चुका अथवा दुरुस्ती असतील किंवा अटींची पुर्तता केलेली नाही अशा बाबतीत समितीने काही शिक्षकांना अटीवर मान्यता देण्यात आली आहे. त्याच बरोबर काही शिक्षकांना मागील स्थाननिश्चितीच्या तारखा चुकल्यामुळे अपात्र केलेले आहे त्यामुळे ज्या शिक्षकांच्या निवड समिती अहवालामध्ये अटी नमुद केलेल्या आहेत अशा शिक्षकांना त्यांच्या स्थाननिश्चिती पत्रामध्ये अटी नमुद करुन त्यांना पत्रे देण्यात आली आहेत. अशा शिक्षकांची वेतननिश्चिती करताना सदरच्या अटींची पुर्तता करण्यासाठी संबंधित शिक्षकांनी विहीत समितीसमोर अर्ज करुन तारखांमध्ये सुधारणा करुन घेणे आवश्यक आहे. ज्या शिक्षकांना अटींवर मान्यता देण्यात आली आहे त्यांनी या कार्यालयाकडे पत्रव्यवहार करुन सदरच्या अटी काढण्याबाबत कार्यालयास विनंती केलेली आहे.

याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या शिक्षकांना त्यांच्या स्थाननिश्चिती पत्रामध्ये अटी नमुद करुन त्यांना पात्र/अपात्र ची पत्रे देण्यात आली आहेत, अशा शिक्षकांची वेतननिश्चितीचे लाभ लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने स्पेशल कॅम्पचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी अशा शिक्षकांनी मार्च २०२२ महिन्याच्या १ ते १० तारखेपर्यंत विहीत शुल्क भरुन व सर्व आवश्यक ती कागदपत्रे जोडून प्रस्ताव सादर करावेत. तसेच सदर प्रस्तावावर या पत्राचा व स्पेशल कॅम्पबाबत उल्लेख करुन अटी नमुद केलेली कागदपत्रे तसेच पुर्तता करत असलेली कागदपत्रे जोडून स्वयंपूर्ण प्रस्ताव दि.१२ मार्च २०२२ पर्यंत सादर करावेत.

सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे. तसेच सदरचा स्पेशल कॅम्प हा या नंतर आयोजित करण्यात येणार नसल्याने स्पेशल कॅम्पबाबतचे प्रस्ताव हे वेळेत सादर करण्याबाबतची सर्व जबाबदारी ही संबंधित शिक्षक व प्राचार्य यांची राहील याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

**एम. पी. कदम**
**उपकुलसचिव**
**संलग्नता विभाग**